पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

ह क्षेत्रिय कार्यालय, कासारवाडी – ४११०३४

मा. ह प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्र. – ०४

सभावृत्तांत

दिनांक ०६/०१/२०२२ रोजीची तहकुब सभा

दिनांक –१३/०१/२०२२ दुपारी-१२.०५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.ह प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०६/०१/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. ची तहकुब सभा दिनांक १३/०१/२०२२ रोजी दुपारी १२.०५वा. ह क्षेत्रिय कार्यालयाच्या पं. दिनदयाळ उपाध्याय सभागृह येथे आयोजीत करण्यात आली. त्यास खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे | - | सभापती |
| २) मा.शाम गणपतराव लांडे | - | सदस्य |
| ३) मा.सुजाता पालांडे | - | सदस्या |
| ४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ | - | सदस्य |
| ५) मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | - | सदस्या |
| ६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र | - | सदस्या |
| ७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय | - | सदस्य |
| ८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय | - | सदस्या |
| ९) मा.सोनवणे शारदा हिरेन | - | सदस्या |
| १०) मा.थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | - | स्विकृत सदस्य |
| ११) मा.कणसे संजय गुलाब | - | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय सभेस मा. थोरात विजयकुमार क्षेत्रीय अधिकारी, श्री.सुपे ए.के.- लेखाधिकरी, श्री.अनिल राऊत- कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.दिलीप धुमाळ – कार्यकारी अभियंता विद्युत, डॉ.शगुन विठ्ठल पिसे- वैद्यकिय अधिकारी, वाय.सी.एम.रुग्णालय, डॉ. अरुण दगडे पशुवैद्यकिय अधिकारी - श्री.संतोष दुर्गे – उपअभियंता विद्युत, श्री.जयकुमार गुजर – उपअभियंता स्थापत्य, श्री.विजयसिंह भोसले- उपअभियंता स्थापत्य, श्री.चंद्रशेखर धानोरकर- उपअभियंता बीआरटीएस, श्री.अरविंद माळी- उपअभियंता नगररचना, श्री.सुनिल दांगडे – उपअभियंता स्थापत्य, बांधकाम परवानगी, श्री.मोरे चंद्रकांत आ.उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.वैभव पुसाळकर- उपअभियंता स्थापत्य उद्यान क्रीडा, श्री.शिंदे विजयकुमार- उपअभियंता , श्री.संजय काशिद – उपअभियंता बीआरटीएस.श्री.सागर पी.व्ही.उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.हरिदास सुनिल जगन्नाथ- उपअभियंता झोनिपु स्थापत्य, श्री.भंडारी एस.पी.-क.अभियंता स्थापत्य, श्री.मोमीन अब्दुलहजीर- क.अ.स्थापत्य उद्यान, श्री.सचिन मगर- क.अभि .स्थापत्य, श्री.महेंद्र

CamScanner

देवरे – क.अभियंता स्थापत्य, श्री.शाम ना गर्जे – क.अभियंता पाणीपुरवठा,श्री.बेळगांवकर सुनिल- कनिष्ठ अभियंता, श्री.कडाळे मच्छिंद्र नामदेव- उद्यान सहाय्यक, श्री.आर.जी.शिरसाठ – उद्यान विभाग, श्रीम.तिटकारे विना. – समुहसंघटक, श्रीम.वैशाली लगाडे – समुहसंघटक, , श्री.एस.बी.मानमोडे – आरोग्य निरीक्षक, श्रीम.आर.जी. तुंडलकर- आरोग्य निरीक्षक, श्री.डी.एम.जगदाळे- आरोग्य निरीक्षक, श्री.सुनिल चव्हाण – आरोग्य निरीक्षक, , श्रीमती कल्याणी वाघमारे - स्थापत्य अभि. सहाय्यक, श्रीम.जयश्री साळवे – क्रीडा पर्यवेक्षक, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

----------

क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव : माहे जानेवारी २०२२ च्या दिनांक १३/०१/२०२२ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

मा. सभापती : सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर माहे जानेवारी २०२२ च्या दिनांक १३/०१/२२ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळाली. माहे जानेवारी २०२२ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

क्षेत्रीय अधिकारी तथा सचिव : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ०३ माहे डिसेंबरचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता मिळावी.

मा.सभापती - मागील सभा कार्यपत्रिका क्र. ०३ माहे डिसेंबरचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

----------

ठराव क्र. -०७ विषय क्र. – ०१

दिनांक : ०६/०१/२०२२ विभाग : -

सूचक- मा.स्वाती (माई) चंद्रकांत काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

संदर्भ - प्रभाग क्र. ३० दापोडी मधील सांस्कृतिक भवन व व्यायाम शाळेचे नामकरण करणेबाबत मा.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ०६/०१/२०२१ रोजीचे पत्र.

प्रभाग क्र.३० दापोडीमधील जयभिमनगर परिसरात दुमजली नवीन सांस्कृतिक भवन व व्यायामशाळा आधुनिक पध्दतीने विकसीत करण्यात आली असुन सदरील इमारतीमधील सांस्कृतिक भवनास "विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर" व व्यायाम शाळेस "कालकथित सागर गौतम बोरडे (नॅशलन कॅरम खेळाडू)" असे नामकरण करणेस मान्यता देण्यात आली आहे. सदरचा वि षय मा.महापालिका सभेच्या मंजूरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

CamScanner

ठराव क्र. -०८

दिनांक : ०६/०१/२०२२

विषय क्र. – ०२

सूचक- मा. .राजू बनसोडे

विभाग : -

अनुमोदक - मा. स्वाती (माई) काटे

संदर्भ - सीएमई गेट समोरील ग्रेडसेपरेटरला नाव देणेबाबत. मा.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०६/०१/२०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र. ३० दापोडी सीएमई गेट समोरील ग्रेडसेपरेटरला अद्याप नाव देणेत आलेले नाही. तरी नुकत्याच हेलिकॅप्टर दुर्घटनेत शहिद झालेले चिफ ऑफ डिफेन्स जनरल बिपिन रावत यांचे नांव देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरचा विषय मा.महापालिका सभेच्या मंजूरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. -०९

दिनांक : ०६/०१/२०२२

विषय क्र. – ०३

सूचक- मा.सुजाता पालांडे

विभाग : -

अनुमोदक - मा.ज्ञानेश्वर थोरात.

प्रभाग क्रमोक २० मध्ये संत तुकाराम महाराज पुतळयाजवळील चौकास छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण करण्यास तसेच अमरज्योत मित्रमंडळ जवळील चौकास स्वर्गीय प्रचिकेत काळे चौक असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरचा विषय मा.महापालिका सभेच्या मंजूरीकामी पाठवणेकरीता शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**दिनांक १३/०१/२०२२ रोजी दुपारी १२.०० वा. झालेल्या सभेमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.**

----------

**मा. संतोष कांबळे -** बांधकाम परवानगी विभागाने गुंठेवारी बाबत माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती -** प्रभागांमध्ये गुंठेवारीचे दप्तर आहे तेथील सर्व फाइल्स आपल्याकडे ह प्रभागांमध्ये आणावेत कारण प्रभागात दप्तर नसल्यामुळे ते शोधण्यास खूप वेळ लागतो. आपले ह प्रभागाचे प्रकरण ड प्रभागात आहे.

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग -** गुंठेवारी जेव्हा तयार झाले तेंव्हा सांगवी ऐरिया ड प्रभाग अंतर्गत होता. त्यांच्या सुमारे दहा हजारच्या आसपास फाईल होत्या.त्या सर्व फाईल ड प्रभागाच्या अखत्यारीत ठेवल्या आहेत.त्यांचे रजिस्टर मेंन्टेन ठेवलेले आहे. येथे जर आणले तर येथे अतिरिक्त कक्ष नसल्याने आणि ठेवायलाही जागा नसल्याने, व आपल्याकडे जागा कमी आहे.आपल्याकडे अर्ज आला तर आपण अर्ज घेतो आपला माणुस तेथे जावुन ते शोधुन घेवुन येतो.

**मा.सभापती-** प्रभागांमधील अधिकाऱ्यांना सांगावे की प्रभागांमध्ये गुंठेवारीचे जुने दप्तर आपल्याकडे ठेवायला लावा. आपले अधिकारी तिकडे थांबत नाही. समर्थ नगर मधील प्रकरण होते. तीन दिवसापासून ते प्रकरण सापडले नाही. त्यामुळे त्याची पावती मिळाली नाही आपल्या प्रभागातील स्थापत्य विभागातील ते दप्तर आहे ते जसेच्या तसे इकडे ह प्रभागात आणावे. प्रभागांमध्ये शोधण्यात वेळ जातो त्यामुळे लोकांच्या

CamScanner

तक्रारी वाढल्या आहेत. ड प्रभागांमधून ह प्रभागाकडे गुंठेवारीचे दप्तर आणावे यावे. पाच दिवसात मला हे सर्व दप्तर आले पाहिजे.

मा. संतोष कांबळे – ड प्रभागांमधून क प्रभागात गेले असता ते ह प्रभागांमध्ये प्रकरण आहे असे माहिती देतात. वेगवेगळ्या विभागांना पाठविले जाते. अध्यक्ष साहेबांनी सूचना केली आहे ती एकदम योग्य आहे. त्यामुळे प्रभागातील गुंठेवारीचे दप्तर प्रभागात आणणे एकदम योग्य आहे.

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग** - २१डिसेंबर २००० पासून शासनाचे आदेश आहेत त्याप्रमाणे आपण अर्ज करण्याची कारवाई केली आहे. गुंठेवारी बाबत काही शंका असेल तर सीएफसी भागातील केंद्राला संगणक विभागांना सांगितल्यावर आवश्यक ती माहिती देण्यात येते. तसेच कागदपत्रे देऊन स्कॅन करून सांगितले जाते. सीएफसी कडे जाऊन लायसन्स एफिडेव्हीट (प्रतिज्ञापत्र) करून स्कॅन अर्ज होतील. व त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयात वाटप केले जातील. सुरुवातीस सीएफसी मध्ये अर्ज करावा लागतो. जुने गुंठेवारी अशाच पद्धतीने होत असते.

**मा. श्याम लांडे** - एक हजार स्क्वेअर फूट बांधकाम केले तर नियम काय आहे ? स्क्वेअर फुट रेट काय काय लावणार आहे?

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग** - हे सर्व रस्त्यावर अवलंबून आहे. एफ एस आय १.७० व नऊ मीटर पेक्षा जास्त रस्ता असल्यामुळे असे ०.९, २०२० चे ३.२० होईल. ज्याप्रमाणे रस्त्याची रुंदी वाढणार त्याप्रमाणे बांधकाम असेल. रस्त्याची रुंदी हा मुख्य नियम आहे. दोनशे रुपये स्क्वेअर फुटाला खर्च आहे . एक रेडी रेट ठरतो. शंभर रुपये आपल्याकडे असेल तर तीनशे रुपये खर्च येईल. दहा हजार स्क्वेअर फूट काढणार आहे. तीन टक्के जागेचे बांधकामास चार टक्के खर्च आहे. शासनाचे नियम आहे चार टक्के वरून १२ टक्के केले आहे. १२+३ = १५ केले आहे. रेडी रेट ठरलेले आहेत.

**मा. शाम लांडे** – एक हजार स्क्वेअर फुटाचा प्लॉट आहे. बांधकाम झालेले आहे, जर १.७ असेल तर नियमात होईल. १७०० पेक्षा जास्त असेल तर त्यांनी स्वतः बांधकाम पाडावे असे आहे का?

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग** - बांधकाम करताना नियमाप्रमाणे पाच फूट सोडावे लागते. बांधकाम मोजून करावे अन्यथा दहा टक्के दंड आकारण्यात यावा.

**मा.श्याम लांडे** – रस्त्यालगत (जादा) एक्स्ट्रा काम झाले आहे त्यास नियम नाहीत का?

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग** - शासनाचे नियमाप्रमाणे केलेले आहे तसेच अनुज्ञेय असेल. त्या व्यतिरिक्त असेल तर आपल्यावर बंधनकारक आहे.

**मा.शाम लांडे** - १.९ मीटर पेक्षा जास्त असल्यामुळे १४ मीटर पर्यंत जाते. ९ मीटर खाली काम झाले आहे. १.५ व ५.६ एखादा डी पी रोड व ५ मीटरचा ३ मीटरचा आहे. या ठिकाणी लोकांनी घरे बांधली आहे. त्यांचे काय करायचे ?

CamScanner

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग -** सहा मीटर बांधकाम करताना किमान पंधरा फूट रस्ता सोडावा. बांधकाम केले असेल तर करता येणार नाही.

**मा. श्याम लांडे -** याअगोदर पाच मीटर केलेले आहे. आता काय करायचे?

**श्री.भागवांणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग -** बऱ्याच ठिकाणी ग्रीन झोन मध्ये बांधकाम झालेले आहे.

**मा.श्याम लांडे -** आरक्षणाच्या जागेत कुणाचा प्लॉट असेल तर काय करायचे?

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग -** पाच दहा फुटाचा रोड असेल तर व नॉन डीपी असेल तर त्या जागेवर ०९ मीटर पेक्षा कमी असेल तर तो १.७० घेण्यात यावा. डी.पी.चा विषय नाही

**मा.शाम लांडे -** चार रुपयेवरुन पस्तीस टक्के केले आहे. दोन रुपये केले पाहिजे आपण काय करू शकतो का? आम्हाला न्याय मिळाला पाहिजे.

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग -** शासनाने दर ठरविलेले आहेत.

**मा.श्याम लांडे -** पंधरा रुपये शासनाला पैसे जातात. चार रुपये महापालिकेला जातात. बारा रुपये इन्कम पाहिले पाहिजे. शासनाचा जीआर आहे.

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग** ज्याप्रमाणे बांधकाम आहे त्याचप्रमाणे त्याची आकारणी करावयाची आहे .थंब रोल आहे, रोड स्कॅन मध्ये नाही. शास्तीकर कमी आहे. भाड्याची पावती जोडायची आहे.

**मा.श्याम लांडे -** किमान शास्तीकर त्यांनी भरला तर चालत नाही का?

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग -** दोन महिन्यापासून अर्ज करावयाचे आहे. अर्ज किती आले आहेत त्यानुसार होईल. एकदा व्यवस्थित पणे सुरळीतपणे चालू झाल्यावर करता येईल.

**मा.श्याम लांडे -** पार्किंग नाही परंतु तीन मजली बांधकाम केलेले आहे त्यांचे काय करावयाचे पार्किंगचे काय करावयाचे आहे.

**मा.ज्ञानेश्वर थोरात -** अर्ज करून बांधकाम केले आहे. आमच्याकडे दहा फुटांपेक्षा जास्त रोड नाही. त्याचे काय करणार आहे? नोकरीसाठी आलेले नागरिक आहेत. त्यांनी थोडी थोडी करून जागा घेतलेली आहे. अर्धा गुंठा मध्ये छोटी छोटी घरे बांधलेली आहेत. त्यांनी काय करायचे?

CamScanner

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग** - दोन पॉईंट चार्टीस चारशे फुट नियमात असेल आहे त्याप्रमाणे बांधकाम करायचे.

**मा. श्याम लांडे** - साडेसहा मिटर आपल्याला त्याचे नुकसान आहे. फक्त गुंठेवारीचे नियम समजावून द्यावेत. एक मजला केला आहे. परत वाढवायला येईल का? हाईटचा नियम काय आहे ते सांगण्यात यावे. नियमामध्ये बसत असल्यामुळे ते काही करू शकत नाही. पीडीएफचा रेट खूप आहे. तसेच दोन मीटरपेक्षा जास्त असेल तर दहा मिटर झाला आहे. ३३ गुंठेचे प्लॉट केले आहेत १५ लोकांनी ते विकले आहेत त्याबाबत काय करता येईल?

**श्री.भागवाणी सुनिल – कार्य.अभियंता अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग** - मालकी हक्काची जागा (प्लॉट) असेल तर त्यांनी कागदपत्रे जोडावी लागतात. मोजणी करावयाची नाही.

**मा.शारदा सोनवणे** - माझ्या वॉर्डमधील रस्त्याचे काम झालेले नाही. तसेच २४x७ पिण्याच्या पाण्याचे काय नियोजन आहे? आमच्या प्रभागात पाण्याच्या किती पाईपलाईन टाकलेल्या आहेत? प्रभाग क्रमांक ३२ मध्ये किती पाईपलाईनचे काम चालू आहे? किती झाले आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

**श्री.चंद्रकांत मोरे - उपअभियंता पाणीपुरवठा विभाग**- पाण्याच्या प्रश्नाबाबत ड्रॉइंग करून दाखवावी लागेल. कन्सल्टंटला बोलावून माहीती सांगण्यात येईल.

**मा. स्वाती (माई) काटे** - सागर बोराडे यांचे नामकरणाबाबत ठराव करण्यात आला आहे. सदर नामकरणाचे काम त्वरीत करण्यात यावे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** - नामकरणाचे ठराव सध्या मा.महापालिका सभेपुढे मंजुरी कामी शिफारस घ्यावी लागते. ठरावा मध्ये एक उल्लेख आहे की मा.महापालिका सभेपुढे पुढील मान्यतेसाठी शिफारस करून मान्यता घेण्यात यावी. त्याप्रमाणे विषयाबाबत आता महापालिका सभेकडे देण्यात येईल.

**मा.सभापती** – माई काटेंचा ठराव आहे त्याबाबत लवकरात लवकर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. पुढच्या आठवड्यात मिटिंग घ्यायची आहे का? एक वर्षापासून नामकरणाचे ठराव दिलेले आहेत. आपली मिटिंग एकच होईल असे वाटते. परत एक मिटिंग घ्यावयाची का?

**मा.क्षेत्रीय अधिकारी** - पुढील मिटींगमध्ये विषय घेतले जाणार नाहीत.

**मा. सभापती**- आपण परत मिटिंगला विषय घेऊन त्याच दिवशी विषय पाठवता येतील.

**मा.शाम लांडे** - पुढच्या मिटींगला सर्वच विषय घेतले तर पुढील महिन्याची मिटिंग गुरुवार दिनांक ०३/०२/२०२२ रोजी असेल.

**मा.सभापती** - प्रभाग क्रमांक ३१ मध्ये कचऱ्याच्या ज्या कुंडया काढल्या आहेत. त्या परत आहे त्या ठिकाणी बसवण्यात याव्यात. लोक आमच्या दारात येऊन कचरा टाकायला लागले आहेत. त्यामुळे कचऱ्याच्या गाड्या आल्यावर कचरा घेऊन जात नाही. आमच्या कुंड्या होत्या त्या तशाच ठेवण्यात याव्यात.

CamScanner

**श्री.महेश आढाव – प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग -** शासनाच्या नियमाप्रमाणे कारवाई करावी लागते. आरोग्य विभागाच्या अखत्यारीत येत नाही.

**मा. सुजाता पालांडे –** आरोग्य विभागाचे काम व्यवस्थित होत नाही यापूर्वी याबाबत मिटिंग घेतली होती त्यामध्ये सूचना देण्यात आल्या होत्या. कचरा कुंडीत कचरा नेण्यासाठी गाड्या वाढविण्याबाबत चर्चा करण्यात आली होती.

**मा.शाम लांडे -** प्रत्येक विभागातील प्रत्येकाचा प्रश्न वेगळा आहे. कासारवाडी येथे काम करणे खूप कठीण आहे. इंदोर पॅटर्न लॉक फक्त फाईल घेऊन फिरतात परंतु कामाची पद्धत अजिबात व्यवस्थित नाही.

**मा.सभापती -** इंदोर पॅटर्न बाबत फक्त सहया घ्यायला सांगतात. कचरा गोळा करायला त्यांना सांगण्यात यावा.

**मा.शाम लांडे-** इंदोर पॅटर्न बाबत नियम काय आहे याबाबत आम्हाला थोडक्यात सांगण्यात यावा. याबाबत आम्हाला सविस्तर सांगावे. इंदोर पॅटर्न बाबत राजकीय हस्तक्षेप खूप कमी आहे. तसेच होल्डिंग लावणे बाबत प्रशासनकडून ठरवतात. प्रत्येक विभागातील लोक सुधारले पाहिजे. पगारा पेक्षा इतर काम करतात. आठ-दहा दिवसात आम्हाला कचऱ्याच्या कुंड्या आहेत त्या ठिकाणी ठेवणे. पूर्वीसारखाच कचरा नेण्यात यावा. कारण आम्हाला खूप त्रास होत आहे. इंदोर पॅटर्न बाबत लाल हिरव्या रंगाचे कचऱ्याचे डबे देतात. गावठाणामधील मालकांचे घर व दुकान किती गुंठ्यांचे अंतर आहे माहित आहे का? कच-याचे डबे कधीच दिले नाही. कचरा नेत नाही. त्यामुळे इंदूर पॅटन हा कशाला करत आहे? तसाच कचरा गोळा करावा. गावठाण मध्ये कचरा गोळा करायला एकही कुंडी ठेवत नाही. बांधकामाची परिस्थिती बघा, उद्यापासून काम चालू केले नाही तर आम्ही बंद करणार आहे. सगळयात जास्त टेंडरमध्ये पैसा गेलेला आहे. दोन-तीन टेंडरमध्ये उदाहरणार्थ कचरा, अमृत योजना व इंदोर पॅटर्न यांना जास्त खर्च केलेला आहे. परंतु कामाच्या बाबतीत काहीही दिसून येत नाही.

**मा.सभापती -** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सर्व प्रभागाचा विचार न करता आमच्या प्रभागातील कचरा घेण्यात यावा. त्याकरिता आहेत तशाच कुंड्या ठेवण्यात याव्यात. आम्ही नागरिकांचे प्रतिनिधित्व करतो. नागरिकांनी आम्हाला जे सांगितले तेच ऐकायचे असते.

**मा.संतोष कांबळे -** प्रभागामध्ये सात गाड्या आहेत. गाड्या वेगवेगळया ठिकाणी दिवसभरात किती वेळा येतात? त्या काहीही काम करू शकत नाही. कचऱ्याच्या कुंड्या का उचललेल्या आहेत? आम्ही आता नागरिकांना सांगणार आहे कचरा आहे तेथेच टाकायचा. आमच्या कचराकुंड्या आहेत त्या तशाच ठेवा व कचऱ्याच्या गाड्या वाढवा.

**मा.शारदा सोनवणे-** रस्त्यावर कचरा पडत असतो तो कचरा कोणी उचलायचा? सर्वत्र तो कचरा तसाच पडलेला असतो. पाचशे रुपये दंड वसूल करता का? तुम्ही ओला कचरा सुका कचरा वेगळा करता का?

CamScanner

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** सर्वजण अधिकारी व पदाधिकारी ट्रेनिंगला जाऊन आलेले आहेत. स्वच्छतेच्या बाबतीत प्रगती व्हावी या करिता पॅटर्न चालू केला आहे. आपले मुद्दे बरोबर आहेत. गाडयांची उपलब्धता वाढवावी लागेल. पाच वर्षाचे टेंडर आहे. गाड्या वाढविण्यात येणार आहे. २२ ते २५ गाड्या वाढवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आता जो त्रास होत आहे तो कमी होईल. महत्त्वाचे म्हणजे नागरिकांचे सहकार्यामुळे प्रगती होत आहे. स्वच्छतेच्या बाबतीत प्रगती होत असताना ज्या काही अडचणी निर्माण होतात त्या काही दिवसात दूर होतील. गाड्यांची मागणी केलेली आहे. त्याबाबतची समस्या दूर होतील.

**मा.सुजाता पालांडे -** सीसीटीव्ही लावायचे काम चालू आहे. ह प्रभागात लिंकवर आलेला नाही. बाकीचे प्रभाग लिंक झाले आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे लागले पाहिजे. इंदोर पॅटर्न झाला पाहिजे. तो करायच्या अगोदर नागरिकांना तो समजला पाहिजे. संत तुकाराम नगरमध्ये रात्रीच्या वेळी टपऱ्या व दुकानांचा कचरा टाकण्यात येतो. दुसऱ्या दिवशी पाहिले तर लोक कचऱ्याचे पोते टाकतात. ताडपत्रीमध्ये भरुन कचरा टाकतात. ही समस्या नेहमीच असते. त्यामुळे प्रभागाने भौगोलिक रचनेवर काम केले पाहिजे. प्रत्येक ठिकाणी क्षेत्रीय कार्यालयाची रचना ही वेगवेगळी असते. कचरा टाकणाऱ्या पिशव्या पाहिल्या नाहीत. दुसऱ्या दिवशी सारथीवर तक्रार देतात. सुखवानी बिल्डींग मध्ये एजन्सी आणली होती. शंभर रुपये त्या एजन्सीला द्यावे लागते. कुणीतरी प्रायव्हेट एजन्सी त्याठिकाणी आणल्यामुळे ओला व सुका कचरा आणून ठेवायचे त्यांना शंभर रुपये द्यायचे. आपल्याकडे पंचवीस रुपये द्यायचे व १०० रुपये प्रायव्हेट एजन्सीला द्यायचे मिळकतधारकांनी हे का सहन करायचे. अगोदर का नाही सांगितले, इंदोर पॅटर्न काय आहे? पॅटर्न कसा करायचा आहे? तो भौगोलिक रचनेवर अवलंबून आहे. आमच्या प्रभागातील नाल्यांचा वास यायला लागला आहे. जे कर्मचारी काम करतात त्यांना नोटिसा दिल्या आहेत का? नाल्यावर कचरा काढत असताना त्यांना काही दुखापत झाली तर काय करायचे? त्यांना कुठल्याही प्रकारचे चपला-बूट नाही. ते कर्मचारी तसेच काम करताना दिसतात. त्यामुळे प्रभागाचा अभ्यास करून सर्व करायचे असते.

**मा.सभापती -** आम्हाला हे जाणवू लागले आहे कच-याच्या बाबतीत काहीही नियोजन नाही. आमच्या प्रभागात आहेत अशाच कुंड्या ठेवण्यात याव्यात.

**मा.सुजाता पालांडे –** यापुर्वीचे आयुक्त होते डीवाईडर लावणेबाबत त्यांचे प्रयत्न होते. व आता इंदोर पॅटर्न राबवत आहेत या गोष्टी बरोबर नाही.

**श्री.आढाव प्र.सहा.आरोग्याधिकारी आरोग्य विभाग-** तुमच्या भावना समजल्या आहेत परंतु मनपाच्या सूचनेनुसार धोरण झालेले आहे. त्याप्रमाणे कामकाज करावे लागते. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना त्या पद्धतीने काम करण्याच्या सूचना देता येत आहे.

**मा.सभापती -** वायसीएम रुग्णालयामध्ये कोविडच्या पेशंटची काय परिस्थिती आहे याबाबत माहिती देण्यात यावी. तसे पेशंटला कुठे एडमिट करायचे, डॉक्टर कोण आहेत हे सांगावे. आपल्या महापालिकेचे कोविड सेंटर कुठे आहेत तसेच तज्ञ डॉक्टर कोण आहेत याबाबत सर्व माहिती देण्यात यावी.

**मा.डॉ.भावसार जेष्ठ वैद्यकिय अधिकारी वायसीएमएच-** महापालिकेचे सर्व दवाखान्यांमधून कोविड पेशंटला ट्रीटमेंट देण्यात येते. सगळ्या डॉक्टरांचे मोबाईल नंबर आहेत त्यांची लिस्ट दोन दिवसात देण्यात येईल.

CamScanner

**मा.राजू बनसोडे** - आमच्या प्रभागात इंजिनिअर आहे का नाही. आठ महिने पासून अजूनपर्यंत एकही जे.इ. आलेले नाही.

**श्री.आडाळे - उद्यान विभाग -** माझ्याकडे आठही प्रभागाचे काम दिलेले आहे. प्रभागात शिवराज कावडे हे सहाय्यक उद्यान अधिकारी आहेत व नम्रता मगर या उद्यान अधिकारी म्हणून काम करीत आहेत.

**श्रीम.नम्रता मगर, उद्यान अधिकारी -** क्षेत्रीय कार्यालयातील उद्यान विभागाबाबत कामकाज दिलेले आहे.

**मा.संतोष कांबळे -** प्रभागाच्या अंतर्गत असलेल्या उद्यानांची पहाणी केली आहे का?

**मा.सभापती-** आता तुम्ही काय करीत आहात?

**श्रीम.नम्रता मगर, उद्यान अधिकारी -** आता सध्या आम्ही उद्यान विभागाबाबत समजून घेत आहोत. क्षेत्रातील उद्यानबाबत माहिती घेत आहोत.

**मा.संतोष कांबळे** - प्रभागातील माहिती घेण्यात यावी. तसेच नगरसेवकांना भेटावे. तुम्हाला काय काम करावयाचे आहे हे समजून घ्यावे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी-** सगळया उद्यानांना भेट देऊन सगळया उद्यानाची पाहणी करण्यात यावी.

**मा.शारदा सोनवणे-** उद्यान विभागाचे लांडगे साहेब आमच्या प्रभागात नको. त्यांची बदली करण्यात यावी.

**मा.स्वाती (माई) काटे -** लिंबोरे वस्तीच्या खूपच समस्या आहेत त्या लवकरात लवकर मार्गी लावाव्या. तेथील काम लवकरात लवकर मार्गी लावावे.

**श्री.शिंदे -** मुरूम टाकून तेथील काम करण्यात येईल

**मा.राजू बनसोडे** – शिंदेसाहेब आल्यापासून चांगले काम होत आहे. आपले पाणी पुरवठा टेंडर निघाले आहेत. तेथीलल काम मार्गी लावावे. आता आमची जुनी सर्व कामे मार्गी लागली लागली पाहिजे.

**मा. सभापती -** आमच्या चारही प्रभागात तपासणीकरिता कोणती लोक येत आहेत, ते कोण आहेत आम्हा नगरसेवकांना का नाही सांगितले. आमच्या हॉटेल मालकाकडे जातात व आम्हाला वरून आदेश आले आहेत असे सांगून आमच्याकडून पैसे मागतात. तुम्ही याबाबत माहिती दिली आहे का, नगरसेवकांना याबाबत माहित आहे का, रात्री अकरा वाजता एका हॉटेलवर पथक गेले होते. १२ हजार रुपयांची मागणी होती, तीन हजार रुपये घेऊन पावती नाही करत असे सांगितले जाते. आम्ही आमच्या लोकांना सांगू का, हे सर्व काम चुकीचे आहे. आम्ही नागरिक तुमच्यावर कंप्लेंट करू शकतो. आदेश दिले तर ते लोक वाऱ्यासारखे सुटतात. लोकांमध्ये परिस्थिती अवघड झाली आहे. त्यांचे अधिकारी १०जण लोक एका वेळेस येतात. व कारवाई करतात.

**मा. क्षेत्रीय अधिकारी -** आपल्या आठही झोनमध्ये दोन शिफटमध्ये पथकांची नेमणूक केलेली आहे. सहायक आरोग्य अधिकारी तसेच इतर पथक तयार केले आहे. जे नागरिक विदाऊट मास्क तसेच कोविडची लस

धतलल्या नागरीकांचे दोन प्रमाणपत्र नसल्यास त्यांच्याकडून दंड करणे हा उद्देश आहे. असे आपल्याकडे जे काही नियम म्हणून दिलेले आहेत तेच काम करीत आहेत. वादग्रस्त होईल असा विषय आणायचा नाही, वाद घालत असतील तर मांगावे लागेल. रूटीनमध्ये आणावयाचे आहे, तशा सूचना आहेत. प्रत्येक प्रशासनाकडून कल्पना देणे अपेक्षित आहे ते झाले पाहिजे.

**मा.संतोष कांबळे -** प्रत्येक पथकाबरोबर एसटी ठेवणेचे काम करणार आहे का

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** दोन सहाय्यक आरोग्य अधिकारी यांची नेमणूक केली आहे. त्यांचे प्रत्येकाचे टाईम वेगळे केले आहेत. एका पथकात पाच लोक आहेत. सगळयांचे शिफ्ट सकाळ-संध्याकाळ आहे.

**मा.ज्ञानेश्वर थोरात-** अधिकाऱ्यांसाठी काही नियम आहे का, फक्त लोकांसाठीच नियम आहेत का, शासनाने नियम लावले आहेत ते फक्त नागरिकांसाठीच आहे का, अधिकारी वर्ग सर्व बाबतीत स्पष्ट आहेत का, अधिकाऱ्यांनी चूक केली तर त्यांना दंड करण्यात येतो का, अधिकाऱ्यांना काय करण्यात येते, नागरिकांनी चूक केली तर त्यांना दंड करण्यात येतो. आपल्या प्रभागात सगळे दंड करीत आहेत. नागरिकांनाच दंड करण्यात येतो. नागरिक आपले पोट भरण्यासाठी या ठिकाणी आलेले असतात. खरंच, हा विषय आपण मा. आयुक्त साहेबांपर्यंत जाऊ द्यावा. लोकशाही आहे का हुकूमशाही आहे, किती अधिका-यांची कामे झाले आहेत, अधिका-यांचे, शासनाचेही काही प्रोटोकॉल आहेत का नाही. कोणी हे काम केले पाहिजे याबाबत सगळीच वाईट अवस्था आहे. या वर्षात जास्त त्रास झाला आहे. वरपर्यंत या सर्व गोष्टी मांडल्या पाहिजेत. अधिकारी हे तीन वर्षांनी जाणार आहेत. सगळा पैशात खेळ करू नका. आपल्या प्रभागात किती प्रॉपर्टी आहे माहित आहे का? आम्हाला वाईट वाटते याविषयी की, सभेमध्ये सगळया अधिकाऱ्यांना बोलावे लागते.

**मा.सुजाता पालांडे –**ब-याचशा मिळकतीबाबत आम्हाला बाहेर जावे लागते. हॉल पाहिजे असेल तर लेटर दिले आहे का? कुठली मिळकत आहे? कुणाच्या हातात आहे. त्यावर काहीच करत नाही. या प्रभागात सुद्धा ठेवला आहे खरंच याबाबत काय केले जात आहे? त्याकडे कोणीही लक्ष देत नाही. नागरिकांची पिळवणूक करण्यात येत आहे.

**मा.सभापती -** नागरिकांना दंड करावा लागत असेल तर त्यावर काही तरी केले पाहिजे. वरून आदेश आल्यामुळे अधिकाऱ्यांना दंड करावा लागतो हे बरोबर आहे का? आदेश आले असेल तर आयुक्तसाहेब आदेश करत आहेत का? चांगले लोकांचे दृष्टिकोनातून चांगले घेत नाही. उद्यान विभागाचे लांडगे आले नाहीत. त्यांची बदली करा. गाड्या वाढवल्या का नाही? कुंड्या आहे त्या ठिकाणी तसेच ठेवण्यात याव्यात. जे कोणी अधिकारी आजच्या मिटींगला आले नाहीत त्यांना नोटीस देण्यात यावी. बीआरटी व स्मार्ट सिटीचे अधिकारी यांच्यावर कारवाई करा.

**मा.संतोष कांबळे –** पर्यायी अधिकारी द्यावेत. व त्यानंतर कारवाई करण्यात यावी.

**मा.सुजाता पालांडे -** नागरवस्ती विकास योजनेकडे ज्या काही योजना राबविण्यात येतात त्याबाबत किती

CS CamScanner

श्रीम.वीणा तिटकारे समूह संघटक – एकूण २१९ अर्ज आलेले आहेत. ६० अर्ज पात्र आहेत व ९६ अपात्र आहेत. काहींच्या नावात बदल आहे. अपात्र लोकांना फोन करून बोलावून घेतले आहे. काही अर्ज डाटा एन्ट्री साठी दिलेले आहेत. पत्र करून पाठवले आहे. काही अर्ज डाटा इंट्रीला गेले आहेत ते अजून आलेले नाहीत.

मा.सुजाता पालांडे- आमच्या प्रभागातील काम आम्ही करू शकतो. फक्त आम्हाला योजनांची यादी देण्यात यावी व पात्र-अपात्र याबाबत व्यवस्थित माहिती द्यावी.

मा.स्वाती काटे – कोरोना काळात विधवा महिलांसाठी काही अनुदान आहे का?

मा.सुजाता पालांडे - विधवा महिलांसाठी महिला बालकल्याण समिती मधून योजना राबविली आहे. त्यांचेकडून अंमलबजावणी केलेली आहे. इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी काही सूचना आहेत का? त्यांची लिस्ट देण्यात यावी.

मा. शाम लांडे - पात्र अपात्र लोकांची लिस्ट देण्यात यावी. सर्व योजनांच्या बाबतीत जे काही पात्र अपात्र यादी असेल ती लवकरात लवकर देण्यात यावी.

मा.सभापती - सगळ्या गोष्टींचे पालन करून विचार करण्यात यावा. २० ते २५ तारखेपर्यंत विशेष सभेला सर्वजण हजर राहिले पाहिजे. विशेष सभा साधारण २० ते २५ तारखेला घेण्यात येईल त्यावेळेस मा.अतिरिक्त आयुक्त साहेब येतील याची नोंद घेणे. मागच्या मिटींगमध्ये जे प्रश्न विचारले असेल त्यांची व्यवस्थित उत्तरे द्यावी. डॉक्टर रॉय नसेल तर त्यांच्या बाबत विचारणा करण्यात येईल. त्यांचे करिता एक पत्र देवून त्यांना सभेला बोलविण्यात यावे. सर्वांनी आपापली काळजी घ्यावी. आमच्या प्रभागात काम होत असेल तर विशेष सभेची तयारी करणे. आता सगळ्या अधिकाऱ्यांचा आम्ही मिटींगमध्ये आदर केला आहे. पुढच्या मिटींगला सर्व अधिकारी उपस्थित राहिले पाहिजे.

माहे जानेवारी २०२१ ची दिनांक १४/०१/२०२१ रोजी झालेल्या सभेस सर्व सन्मा.सदस्यांचे व सर्व विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानून मासिक सभेचे कामकाज संपलेचे जाहीर करण्यात आले.

Kamble
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती, ह प्रभाग समिती,
कासारवाडी – पुणे -३४

क्षेत्रीय अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ह क्षेत्रीय कार्यालय
कासारवाडी –पुणे -३४

OK
25/1/22

क्र.हक्षेका/कावि/ ०७/२०२२
दिनांक - २४/०१/२०२२

CamScanner